स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद**
**(सामान्य प्रशासन शाखा)**

दुरध्वनी क्र.- 0240-2339811 पत्ता- दिल्ली गेट जवळ, औरंगाबाद 431001 Email-dcg.aurangabad@gmail.com

---

**जा.क्र.-2023/सा.प्र./आस्था/मराठा आरक्षण/कावी-** 366 **दिनांक- 22/11/2023.**

**प्रति,**
**सर्व जिल्हाधिकारी,**
**छत्रपती संभाजीनगर/जालना/परभणी/हिंगोली/नांदेड/बीड/लातुर/धाराशिव.**

**विषय:-** मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे समाजाचे सर्वेक्षण करण्याकरिता करावयाची कार्यवाही बाबत.

| | |
|---|---|
| **संदर्भ:-** | अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र. बैठक/प्र.क्र.36/16 क,<br>दिनांक 20.12.2023 |

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये कळविल्यानुसार मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यतेखाली दिनांक 20/12/2023 रोजी दुपारी 4.00 वाजता बैठक / दुरदृष्टी प्रणालीव्दारे (Video Conference ) आयोजित करण्यात आलेली होती सदर बैठकी मध्ये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या मराठा समाजाचे मागसलेपण तपासण्याबाबतच्या आयोगास दिलेल्या सुचनेनुसार आयोगामार्फत शहरी व ग्रामीण भागातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील जातीचे सर्वेक्षण करुण माहिती गोळा करण्यात येणार आहे.

सर्वेक्षण शासकीय यंत्रणेमार्फत करुन घ्यायचे आहेत. सर्वेक्षणासाठी 150 ते 200 कुटुंबासाठी 1 या प्रमाणात सुमारे 1 लाख कर्मचा-यांची नियुक्ती करावी लागेल. त्याकरिता तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक इत्यादी कर्मचा-यांची नियुक्ती करावी लागणार आहे. सदर कामाकरीता गोखले इन्स्टिटयुट ऑफ इकॉनॉमिक्स पुणे, IIPS व मुंबई यांच्याकडुन सर्वेक्षणाच्या कामाकरिता Software Application तयार करुन, कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी तयार करण्यात येणारे Software Application मोबाईलवर वापरता Internet Connection नसतानाही वापरता येणार आहे. या शिवाय इतर काही सुचना व प्रश्नावली तयार करण्यात आलेली असुन ती या सोवत पाठविण्यात येत आहे.

वरील कार्यवाहीबाबत करण्याबाबत सविस्तर सुचना आयोगामार्फत प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल. व सदर कार्यवाही ही विहित कालावधीत पुर्ण करवयाची असल्याने सोबत दिलेल्या सुचना पत्रानुसार पुर्व तयारी करण्यात यावी.

**<u>सोबत :- सुचनापत्र व प्रश्नावली .</u>**

**(मधुकर अर्दड)**
**विभागीय आयुक्त**
**छत्रपती संभाजीनगर**

# मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे समाजाचे सर्वेक्षण करण्याकरीता करावयाची कार्यवाही

- राज्य शासनाच्या मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याबाबतच्या आयोगास प्राप्त दि. १३/११/२०२३ रोजीच्या पत्रानुसार आयोगामार्फत शहरी व ग्रामीण भागातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील जातीचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा करण्यात येणार आहे.
- सदर सर्वेक्षण शासकीय यंत्रणेमार्फत करुन घ्यायचे आहेत. सर्वेक्षणसाठी १५० ते २०० कुटुंबासाठी १ या प्रमााणात सुमारे १ लाख कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी लागेल. त्याकरिता तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक इ. कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी लागेल. शासकीय यंत्रणेव्दारे करावयाचे प्रत्यक्ष सर्वेक्षण हे १५ दिवसांच्या कालावधीत करावयाचे आहे. सर्वेक्षणाकरिता नियुक्त करावयाच्या कर्मचाऱ्यांना मानधन देण्यात येईल.
- गोखले इन्स्टिट्युट ऑफ इकॉनॉमिक्स पुणे, IIPS मुंबई यांच्याकडून सर्वेक्षणाच्या कामाकरिता Software Application तयार करुन, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी तयार करण्यात येणारे Software Application मोबाईलवर वापरता येईल.
- आयोगामार्फत मागासवर्गाबाबतचे निकष व प्रश्नावलीस मान्यता देण्यात आली आहे. सर्वेक्षणासाठी Software Application तयार करण्यात येत आहे. Internet Connection नसतानाही Software Application वापरुन आकडेवारी गोळा करता येईल.
- Software तयार झाल्यानंतर कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात येऊन प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात करण्यात येईल. प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम १५ दिवसात पूर्ण करावयाचे आहे.
- प्रश्नावली भरून घेण्याकरिता नियुक्त कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्याकरिता ३६ जिल्हे व २७ महानगरपालिकासाठी प्रत्येकी १ स्वतंत्र प्रशिक्षक/ तज्ञ संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यातील व महानगरपालिकेतील उपजिल्हाधिकारी/ प्रांताधिकारी दर्जाच्या ३ अधिकाऱ्यांना (Master Trainer) नियुक्त संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. त्यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शहरी / ग्रामीण भागातील सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यायचे नियोजन करावयाचे आहे.
- सर्वेक्षण करीत असताना कर्मचा-यांना येणा-या अडचणी शंकाचे निरसन करण्यासाठी प्रत्येक तालुक्यास १ प्रशिक्षण तज्ञ संस्थेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. सर्वेक्षणात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी यंत्रणा/ Helpline निर्माण करण्यात येईल.

- सर्वेक्षणासाठी तयार करण्यात येणारे Software Application मोबाईलवर वापरता येईल. त्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणासाठी नियुक्त करण्यात येणा-या कर्मचा-यांना युजर आयडी (User ID), पासवर्ड (Password) देण्यात येणार आहे. त्याकरिता कामासाठी नियुक्त करावयाच्या कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, कामाचे गाव/ठिकाण, तालुका, जिल्हा ही माहिती प्रत्येक जिल्ह्याधिकाऱ्यांनी आयोगास उपलब्ध करुन द्यावी.
- या कामाच्या समन्वयासाठी प्रत्येक जिल्ह्यातून जिल्हाधिकारी, १ उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, प्रत्येक तालुक्यातील तहसिलदार, १ नायब तहसिलदार तर महापालिका क्षेत्रासाठी महापालिका आयुक्त, १ उपायुक्त, प्रत्येक वॉर्डातील वॉर्ड ऑफीसर यांचे नाव, पदनाम मोबाईल क्रमांक, ई-मेल, कामाचे ठिकाण, महानगरपालिका नाव, जिल्हा ही माहिती आयोगास अपलब्ध करुन द्यावी.
- याबाबतच्या विस्तृत सूचना देण्याकरिता आयोगामार्फत VC व्दारे बैठक आयोजित करण्यात येईल. व कामाबाबतच्या लेखी सूचना उपलब्ध करुन देण्यात येतील.